| | | | | |
|---|---|---|---|---|
| **MHPU180022402017** | दाखल तारीख | १२ | १० | २०१७ |
| | नोंदणी तारीख | ०७ | ११ | २०१७ |
| | निकाल तारीख | ०६ | ०७ | २०२६ |
| | **कालावधी** | **व– ०८** | **म– १०** | **दि– २३** |

**भाग 'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, (न्यायालय क्र.२) दौंड**
**यांच्या न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : एस.एन. पाटील यांचे समक्ष)

| | |
|---|---|
| **नियमित फौजदारी खटला क्र. २८०/२०१७** | **नि.क्र.१४१** |
| **न्यायनिर्णय दिनांक** | **०६–०७–२०२६** |
| **अपराध क्रमांक** ४२२/२०१७ | पोलिस स्टेशन दौंड |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलीस ठाणे अधिकारी, दौंड,<br>ता.: दौंड, जि.: पुणे |
| अभियोग पक्षातर्फे | | श्री. एस. पी. आंधळे सहा. सरकारी अभियोक्ता |
| **// विरुध्द //** | | |
| **आरोपी** | | **१. दिवाकर मधु शेट्टी**<br>वय – ४० वर्ष, धंदा– मजुरी,<br>सध्या रा. अनुराग हॉटेल, कुरकुंभ, ता. दौंड, जि. पुणे<br>मुळ रा. शंकर पुरम, ता. उडपी, जि. पादोर, कर्नाटक<br>**२. भास्कर बंडु शेट्टी**<br>वय – ४३ वर्ष, धंदा– मजूरी<br>मुळ रा. उदयावळ, ता. उडपी, जि. पादोर, कर्नाटक<br>**३. चंद्रशेखर सुंदर शेट्टी**<br>वय – ४० वर्ष, धंदा– मजुरी,<br>मुळ रा. कडपाडी, ता. उडपी, जि. पादोर, कर्नाटक<br>२, ३ सध्या रा. कृष्णा हॉटेल, दौंड, जि. पुणे. |
| आरोपींतर्फे | | ॲड श्री. आर. आर. बोडखे |

## भाग 'ब'

| | | |
|---|---|---|
| घटना तारीख | :– | २९.०७.२०१७ |
| प्रथम खबर तारीख | :– | ३०.०७.२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | :– | १२.१०.२०१७ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | :– | ०७.०६.२०१८ |
| पुरावा सुरू झालेली तारीख | :– | ०७.०६.२०१८ |
| न्यायनिर्णयाकरीता राखीव ठेवलेली तारीख | :– | ०६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ०६.०७.२०२६ |
| शिक्षा सुनावण्याकरीता नेमलेली तारीख | :– | –– |

## आरोपींचा तपशील

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटकेची तारीख | जमानत मिळाल्याची तारीख | ठेवलेले दोषारोपाची गुन्हा कलम | आरोपीची निर्दोष मुक्तता किंवा शिक्षा | सुनावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता ४२८ च्या अनुषंगाने आरोपीने संपरीक्षा दरम्यान आरोपी जेलमध्ये असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिवाकर मधु शेट्टी | ३०.०७.२०१७ | १९.०९.२०१७ | अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ४,५ व शस्त्र अधिनियम कलम ४, २५ | **निर्दोष मुक्तता** | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | भास्कर बंडू शेट्टी | ३०.०७.२०१७ | १६.१०.२०१७ | अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ४,५ व शस्त्र अधिनियम कलम ४, २५ | **निर्दोष मुक्तता** | – | – |
| ३. | चंद्रशेखर सुंदर शेट्टी | ३०.०७.२०१७ | १६.०९.२०१७ | अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ४,५ व शस्त्र अधिनियम कलम ४, २५ | **निर्दोष मुक्तता** | – | – |

## भाग 'क'

**अ. अभियोग पक्ष साक्षदार :–**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | आशा रमेश मोहिते | पंच |
| सा.क्र. २ | लक्ष्मण धर्मा सोनवणे | पंच |
| सा.क्र. ३ | गजानन प्रल्हाद जाधव | फिर्यादी |
| सा.क्र.४ | भगवान बबनराव निंबाळकर | साक्षीदार |
| सा.क्र.५ | असिफ नबीलाल शेख | साक्षीदार |
| सा.क्र.६ | सुनिल सोपानराव बगाडे | साक्षीदार |

**ब– बचाव पक्ष साक्षदार :–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

**क– न्यायालयामार्फत साक्षीदार :–**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## <u>अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय निशाणी</u>

**अ– अभियोग पक्षाचे निशाणी :**

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ९४ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | १०५ | घटनास्थळ व जप्ती पंचनामा |
| ४. | १०६ | फिर्याद |
| ५. | १०७ | एफ.आय.आर. |
| ६. | १०८ | मुद्देमाल पावती |

**ब– बचाव पक्षाचे निशाणी :**

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**क– न्यायालयामार्फत निशाणी :**

| अ–क्र– | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| – | – | – |

**ड– मुद्देमाल :**

| अ.क्र. | तपशील | मुद्देमाल क्रमांक |
|---|---|---|
| १. | एक खाकी रंगाचा पुठ्ठचाचा बॉक्स त्यात जरूर कंपनीचे निरोध पाकीटे बॉक्स भरलेला अंदाजे मुल्य ३,०००/– | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |

| | | |
|---|---|---|
| २. | एक लोखंडी कोयता त्याची लांबी १४ सें.मी. व त्यास लाकडी मुठ साडेपाच सें.मी. असुन त्याचे पाते समोरील बाजुस वाकलेले. | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ३. | एक लोखंडी कोयता त्याची लांबी १६ सें.मी. व त्यास लाकडी मुठ ६ सें.मी. असुन त्याचे पाते समोरील बाजुस वाकलेले | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ४ | एक ऊस तोडायचा कोयता त्याची लांबी साडेआठरा सें.मी. व त्यास निळी प्लॅस्टीकची मुठ साडेपाच सें.मी. असुन त्याचे पातेची रूंदी ४ सें.मी. असलेला | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ५ | एक ऊस तोडायचा कोयता त्याची लांबी साडेसतरा से. मी. मुठ नसलेला त्यांचे पातेची रूंदी ४ सें.मी. असलेला | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ६ | ५०० रूपये दराची एक नोटा तिचा नंबर 9AH 151315 | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ७ | एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन नंबर त्याचा आय.एम.ई.आय. नंबर 355631076248569, 355632076248567 असा असलेला त्यात हॉटेल चालविणारा चंद्रशेखर शेट्टी यांचे नांवावरील आयडीया कंपनीचे सिमकार्ड नंबर ९०२८८५८७६६ व त्याचे नांवावरील एअरटेल कंपनीचे सिमकार्ड नंबर ९९६०२२४१६६ अंदाजे रक्कम रू.५००/- | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ८ | सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन त्याचा आय. एम. ई. आय. नंबर 351926060877280, 351927060877288 असा असलेला त्यात हॉटेल चालविणारा चंद्रशेखर शेट्टी यांचे नांवावरील आयडीया कंपनीचे सिमकार्ड नंबर ७२१८२१३२४५ अंदाजे रक्कम रू.५००/- | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |

| | | |
|---|---|---|
| ९ | एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन त्याचा आय.एम. ई.आय. नंबर 35474187469178/01, 354742087469176/01 असा असलेला त्यात माझी मैत्रिण पंचशिला संजय नलवडे हिचे नांवावर असलेले एअरटेल कंपनीचे सिमकार्ड नंबर ७०२८२५४३०६ असे जु.वा.किं.अं. अंदाजे रक्कम रू.२,०००/– | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| १० | ५९० रूपये रोख त्यात ५०० रूपये दराची १ नोट, ५० रूपये दराची १ नोट, १० रूपये दराच्या ४ नोटा व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन त्याचा आय.एम. ई. आय. नंबर 352313073269723/01, 352314073269721/01 असा असलेला त्यात माझे नांवावरील आयडीया कंपनीचे सिमकार्ड नंबर ७५१७५६२१८७ व जाव इम्रान नईम शेख हिचे नांवावरील एअरटेल कंपनीचे सिमकार्ड नंबर ७४१०७२३५६३ अंदाजे रक्कम रू.२५९०/– | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| ११ | २०० रूपये रोख रक्कम त्यात १०० रूपये दराच्या २ नोटा व एक सॅमसंग कपंनीचा मोबाईल फोन नंबर त्याचा आय.एम.ई.आय. नंबर 357965057134481/01, 357966057134489/01 असा असलेला त्यात मैत्रिण साईना पुर्ण नांव माहित नाही हिचे नांवावरील टाटा डोकोमो कंपनीचे सिमकार्ड नंबर ८४४६७३०२२० असे जु.वा.किं.अं. अंदाजे रक्कम रू.२,२००/– | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |
| १२ | त्यात २००० रूपये रोख रक्कम त्यात ५०० रूपये दराच्या ४ नोटा व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन त्याचा आय.एम.ई.आय. नंबर 358312069629589/01, 358313069629587/01 असा असलेला त्यात माझे मित्राचे नांवावरील युनिनॉर कंपनीचे सिमकार्ड नंबर ९१७५०९१८११ अंदाजे रक्कम रू.४०००/– | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |

| | | |
|---|---|---|
| १३ | २००० रूपये रोख त्यात २००० रूपये दराची एक नोट व एक पॅनॉसॉनिक कंपनीचा मोबाईल फोन त्याचा आय.एम.ई.आय. नंबर 352452081126184, 352452081181189 असा असलेला त्यात माझे पती शहाजान मुल्ला यांचे नांवावर असलेले युनिनॉर सिमकार्ड नं. ९१५६५४६३२३ व माझे नांवावर असलेले एअरटेल कंपनीचे सिमकार्ड नंबर ८५३०१६९३३२ व लाखी शाहाजन मुल्ला असे नांव असलेले आधार कार्डची कलर झेरॉक्स लॅमीनेशन केलेली असे जु.वा.किं.अं. अंदाजे रक्कम रू.४,०००/– | पी. आर.क्र. ५२/२०२३ व्ही.पी.आर.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२३) |

## न्यायनिर्णय
## (अधिघोषित दिनांक ०६ जुलै, २०२६)

फिर्यादी गजानन प्रल्हाद जाधव यांच्या फिर्यादवरून आरोपींविरूध्द अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ४,५ सह शस्त्र अधिनियम १९५९ कलम ४, २५ अन्वये प्रस्तुत खटला दाखल केला आहे.

**खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे–**

**०२.** दि.२९.०७.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेच्या सुमारास फिर्यादी यांना खास बातमीदारांमार्फत दौंड गावचे हद्दीत गोल राऊंड चौकाजवळ कृष्णा इंटरनॅशनल लॉज व हॉटेल येथे काही व्यक्ती मुलींना आणून अवैध वेश्या व्यवसाय करून त्यावर पैसे मिळवून आपला उदरनिर्वाह चालवित असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून सदर माहिती उप–विभागीय पोलीस अधिकारी, दौंड यांना फोन द्वारे कळविली असता, त्यांनी योग्य ती कारवाई करण्याबाबत फिर्यादीस तोंडी कळविले. त्यावरून फिर्यादी हे त्यांचे सह कर्मचा–यांसह दोन खात्रीलायक पंच व एक बनावट ग्राहक नामे किरण शशिकांत पोतदार वय–४३ रा. बेडद, ता. मिरज, जि. सांगली यांना घेवून घटनास्थळी गेले. सदर बनावट ग्राहकाजवळ ५००रू.

दराची एक नोट ज्याचा क्र.९एएच१५१३१५डी व सदर ग्राहकास कृष्णा हॉटेलमध्ये जावून सेक्स करण्याकरीता मुली मिळतात का? व त्यांचे रेट काय आहेत ? याची खात्री करण्याबाबत सांगितले व बातमी खरी असल्यास लॉजचे रुम मधून हात बाहेर काढून पोलीसांना इशारा करून बोलाविण्यास कळविले. त्यानुसार घटनास्थळी गेलेल्या ग्राहकाने लॉजमध्ये गेल्यानंतर १५ मिनिटांनी इशारा करून फिर्यादी व त्यांचेसोबत असलेल्या पंच व इतर पोलीसांना बोलावून घेतले. त्यावेळी सदर लॉजच्या पहिल्या मजल्यावर काउंटरवर असलेल्या इसम नामे दिवाकर मधू शेट्टी याचे शर्टाचे खीशात सदर ५००रू. दराची नोट मिळून आली. तसेच, सदर लॉजच्या पहिल्या मजल्यावरील काउंटरच्या पश्चिमेकडे रुम नं. १०६ मध्ये एक मुलगी नामे शालीनी नरवडे व बनावट ग्राहक असे बसलेले दिसले. त्यानंतर रुम नं.१०१ मध्ये देखील काही मुली वेश्या व्यवसाय करत असल्याचे दिसले. सदर कृष्णा हॉटेल व लॉज चंद्रशेखर शेट्टी चालवित असून त्याने सदर वेश्या व्यवसाय करण्यासाठी डॉ. बेनीप्रसाद अग्रवाल रा. दौंड यांचेकडून सदर लॉज भाडे तत्वावर घेतला असल्याचे समजले. सदर छापा टाकते वेळी आरोपींच्या कब्जात बेकायदेशीररित्या घातक शस्त्र ऊस तोडायचे कोयते मिळून आले. त्यामुळे सदर आरोपींविरूध्द फिर्याद दाखल करण्यात आली.

**०३.** फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरून पोलीसांनी आरोपींविरूध्द गुन्हा क्र. ४२२/२०१७ अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ४,५ व शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अन्वये नोंदविला. त्यानंतर तपासी अंमलदारांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा व जप्ती पंचनामा तयार केला. संबंधीत साक्षदारांचे तपास टिपण नोंदवले आणि चौकशीचे आवश्यक कामकाज पुर्ण झाल्यावर तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

**०४.** सदर आरोपींविरूध्द निशाणी क्र.८१ प्रमाणे अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ४,५ व शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अंतर्गत दोषारोप निश्चीत करण्यात आले.

आरोपींना त्यांचेविरुध्द् लावण्यात आलेले आरोप वाचुन दाखवले असता ते त्यांनी नाकारले व संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरूध्द् अभिलेखावर पुरावा आल्याने त्यांचे कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत निवेदन नोंदविले. आरोपींनी त्यांचेविरुध्द खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

**०५.** सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपींचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**०६.** अभिलेखावरील दोन्ही पक्षांच्या पुराव्यावरुन आणि युक्तिवादावरुन प्रस्तुत खटल्याचे निकालाकरीता पुढील मुद्दे माझे समक्ष उपस्थित होतात. त्या मुद्यांबाबतचे निष्कर्ष मुद्यांचे समक्ष, सकारण मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे:–

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| **१.** आरोपींनी दिनांक २९.०७.२०१७ रोजी सायंकाळी ०७.०५ वाजताचे सुमारास मौजे – दौंड, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत गोल राऊंड चौकाजवळील कृष्णा हॉटेल व लॉजमध्ये महिलांकडुन वेश्या व्यवसाय म्हणजेच अनैतिक शारीरिक व्यापार करून त्यांच्या कमाईवर अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ४ मध्ये नमुद प्रमाणे उपजीवीका करताना मिळुन आला व त्याद्वारे अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ चे कलम ४ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी....** |
| **२.** आरोपींनी वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी महिलांना वेश्या व्यवसाय करण्यासाठी त्यांना प्राप्त करणे अथवा मिळवणे अथवा प्रवृत्त करणे अथवा घेणे करीता अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ५ मध्ये नमुद प्रमाणे कृत्य करताना मिळुन आला व त्याद्वारे अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ चे कलम ५ सह ३४ चा शिक्षापात्र अपराध केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी....** |
| **३.** आरोपींनी संगनमताने वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी त्यांच्या कब्जात बेकायदेशीररित्या अनाधिकाराने कोणतीही परवाना नसताना विना परवाना घातक शस्त्र बाळगले असताना मिळुन आला व त्याद्वारे शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४ सह २५ चा शिक्षापात्र अपराध केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी....** |

| | |
|---|---|
| ४. आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे....** |

## <u>कारणमिमांसा</u>

०७. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द् गुन्हा सिध्द करण्याकरीता एकुण ६ साक्षीदारांचा मौखीक पुरावा नोंदविण्यात आला. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ आश रमेश मोहिते (घटनास्थळ पंच) यांना निशाणी क्र.९३ वर, साक्षीदार क्र.२ लक्ष्मण धर्मा सोनवणे (घटनास्थळपंच) यांना निशाणी क्र.९८ वर, साक्षीदार क्र.३ गजानन प्रल्हाद जाधव (फिर्यादी) यांना निशाणी क्र.१०४ वर, साक्षीदार क्र.४ भगवाण बबनराव निंबाळकर (पोलीस अधिकारी) यांना निशाणी क्र.११४ वर, साक्षीदार क्र. ५ आसिफ नबीलाल शेख (पोलीस हवालदार) यांना निशाणी क्र.११५ वर आणि साक्षीदार क्र.६ सुनिल सोपान गावडे (पोलीस अधिकारी) यांना निशाणी क्र.१२६ वर तपासले.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता :</u>**

०८. सदर तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रीत देण्यात येत आहे जेणेकरून पुराव्याची पुर्नःवृत्ती होणार नाही. प्रथम सदर प्रकरणातील आरोपींविरूध्द लावण्यात आलेले अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ व शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४, २५ चे अवलोकन करून ते प्रेशित करणे गरजेचे आहे.

> ***<u>Section 4 in The Immoral Traffic (Prevention) Act, 1956</u>***
> ***Punishment for living on the earnings of prostitution.***
> *<u>(1)</u>Any person over the age of eighteen years who knowingly lives, wholly or in part, on the earnings of the prostitution of a woman or girl shall be punishable with imprisonment for a term which may extend to two years, or with fine which may extend to one thousand rupees, or with both.<u>(2)</u>Where any person is proved-<u>(a)</u>to be living with, or to be habitually in the company of, a prostitute; or<u>(b)</u>to have exercised control, direction or influence over the movements of a prostitute in such a manner as to show that such person is aiding, abetting or compelling her prostitution; or<u>(c)</u>to be acting as a tout or pimp on behalf of a prostitute, it shall be presumed, until the contrary is proved, that such person is knowingly living on the earnings of prostitution of another person within the meaning of sub-*

*section (1):Provided that no such presumption shall be drawn in the case of a son or daughter of a prostitute, if the son or daughter is below the age of eighteen years.*

***Section 5 in The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 Procuring, inducing or taking woman or girl for the sake of prostitution.*** *(1)Any person who-(a)procures or attempts to procure a woman or girl, whether with or without her consent, for the purpose of prostitution; or(b)induces a woman or girl to go from any place, with the intent that she may for the purpose of prostitution become the inmate of, or frequent, a brothel; or(c)takes or attempts to take a woman or girl, or causes a woman or girl to be taken, from one place to another with a view to her carrying on, or being brought up to carry on prostitution; or(d)causes or induces a woman or girl to carry on prostitution;shall be punishable on first conviction with rigorous imprisonment for a term of not less than one year and not more than two years and also with fine which may extend to two thousand rupees.(2)In the event of a second or subsequent conviction of an offence under this section a person shall be punishable with rigorous imprisonment for a term of not less than two years and not more than five years and also with fine which may extend to two thousand rupees.(3)An offence under this section shall be triable-(a)in the place from which a woman or girl is procured, induced to go, taken or caused to be taken or from which an attempt to procure or take such woman or girl is made; or(b)in the place to which she may have gone as a result of the inducement or to which she is taken or caused to be taken or an attempt to take her is made.*

***The Arms Act, 1959 – Section 4 Licence for Acquisition and Possession of Certain Arms*** *If the Central Government, having regard to the circumstances prevailing in any area, considers it necessary or expedient in the public interest, it may, by notification in the Official Gazette, direct that no person shall acquire, possess, or carry any specified class or description of arms (other than firearms) in that area except under and in accordance with the conditions of a valid licence. After such a notification is issued, no person in the notified area may: acquire, possess, or carry the specified class of arms without a valid licence. In brief: Section 4 does not apply throughout India by default. It applies only to the areas and classes of arms specifically notified by the Central Government. In such notified areas, a valid licence is mandatory to acquire, possess, or carry the specified arms.*

***The Arms Act, 1959 – Section 25 Punishment for Certain Offences***

*Section 25 prescribes penalties for various violations of the Arms Act, 1959. It covers offences such as: Manufacturing, selling, transferring, converting, repairing, testing, or proving arms or ammunition without the required licence. Acquiring,*

*possessing, carrying, or using prohibited arms or prohibited ammunition in violation of the Act. Acquiring, possessing, or carrying arms or ammunition without a valid licence where one is required. Violating any condition of a licence granted under the Act. Possessing or carrying arms or ammunition in contravention of notifications or other provisions of the Act. Other offences specified under the Act involving unlawful dealing with arms and ammunition. Punishment: The punishment under Section 25 varies depending on the nature and seriousness of the offence. It may include: Imprisonment, ranging from less than one year to imprisonment for life in the most serious cases (such as offences involving prohibited arms or prohibited ammunition), and/or Fine. The exact punishment depends on the specific subsection of Section 25 (for example, Sections 25(1), 25(1A), 25(1AA), 25(1B), 25(1C), etc.), as each provides different penalties for different offences. If you need the exact legal text of Section 25 or an explanation of a particular subsection (such as Section 25(1B)(a), which is commonly invoked for possession of arms without a licence), let me know.*

९. उपरोक्त कलमांच्या अनुषंगाने अभियोगपक्षातर्फे प्रकरणात आलेलल्या पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाचे सा.क्र.१ व २ हे घटनास्थळ पंच आहेत. सदर दोन्ही साक्षीदारांनी घटनास्थळ पंचनाम्यावरील सही त्यांची असल्याची बाब नमुद केली. परंतू, त्यातील मजकुराबाबत त्यांना काही माहिती नसल्याचे नमुद केले. त्यामुळे सदर साक्षीदार अभियोग पक्षास फितूर झाल्याने साक्षीदाराचा अभियोग पक्षातर्फे उलटतपास नोंदविण्यात आला. परंतू, सदर दोन्ही साक्षीदार यांनी आरोपींविरूद कोणतीही आक्षेपहार्य बाब सांगितली नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांच्या साक्षीचा उपयोग अभियोग पक्षास होणार नाही.

१०. अभियोग पक्षाचे सा.क्र.३ गजानन जाधव हे प्रकरणातील फिर्यादी आहेत. सा.क्र.३ गजानन जाधव यांच्या साक्षीत असे आले आहे की, दि.२९.०७.२०१७ रोजी ते दौड पोलीस स्टेशनमध्ये पोलीस उप–निरिक्षक या पदावर कार्यरत असताना त्यांना पोलीस निरिक्षक निंबाळकर यांनी त्यांचे कक्षात बोलावून गोपनीय माहिती सांगितली की, कृष्णा इंटरनॅशनल दौंड येथे काही महिला अनाधिकृतरित्या वेश्या व्यवसाय करत आहेत. त्यानंतर

सदर घटनेची माहिती उप–विभागीय अधिकारी दौंड यांना दिल्यानंतर त्यांनी फोनद्वारे फिर्यादीस कारवाई करण्याबाबत आदेशीत केले. त्यानंतर फिर्यादीने एक बनावट ग्राहक, दोन पंच तसेच, इतर पोलीस कर्मचा–यांना सदर मिळालेल्या गोपनीय बातमीचा आशय सांगून बनावट ग्राहकाकडे रू.५००/– ची नोटी देण्यात आली. त्यानंतर सदर फिर्यादी व इतर पोलीस कर्मचारी तसेच, पंच व बनावट ग्राहक असे घटनास्थळ हॉटेल जवळ पोहोचले. साक्षीदाराच्या साक्षीत पुढे असे आले आहे की, बनावट ग्राहकाला हॉटेलमध्ये पाठवून जर वेश्या व्यवसाय होत असेल तर, सदर हॉटेलच्या रुमधील खिडकीतून हातवारे करून पोलीसांना बोलावण्यास सांगितले.

११. सदर बनावट ग्राहक हॉटेल/लॉजच्या पहिल्या मजल्यावर रुमध्ये गेला व त्याने सदर रुमधून हॉटेलच्या आजुबाजू थांबलेल्या पोलीस कर्मचा–यांना इशारा करून बोलाविले. त्यानुसार बनावट ग्राहक असलेल्या रूम क्र.१०६ मध्ये बनावट ग्राहक व एक महिला मिळून आली. तसेच, त्यांना ताब्यात घेवून हॉटेलची झडती घेतली असता, हॉटेल मध्ये एक निरोधाचा बॉक्स, दोन लोखंडी कोयते, दोन ऊस तोडायचे कोयते आढळून आले. तसेच, मोबाईल व काही रोख रक्कम मिळून आली. सदर मुद्देमालाचा पंचनामा पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी केला. त्यावेळी पंच सा.क्र.१ व २ हे हजर होते. सदर पंचनामा व जप्ती पंचनामा नि.क्र.१०५ त्यांचे साक्षीतुन शाबीत करण्यात आले. तसेच, दाखल फिर्याद नि.क्र.१०६ शाबीत करण्यात आली. तसेच, त्यांनी तपासाकामी आरोपी व हॉटेल मालक यांच्यातील भाडे करार जप्त केला. जागा मालकाची तपास टिपन नोंदविले व तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराचे उलटतपासात त्यांनी कबुल केले की, घटनास्थळी अवैध मानवी तस्करी व्यवसाय चालतो याबाबत कोणतीही लेखी तक्रार पोलीस स्टेशनमध्ये आली नव्हती. तसेच, घटनास्थळी छापा टाकला त्यावेळी बनावट ग्राहकाव्यतिरीक्त इतर कोणीही ग्राहक त्यांना घटनास्थळी मिळून आला नाही. तसेच, सदर बनावट ग्राहक किरण शशीकांत पोतदार व कारवाईसाठी घेतलेले दोन पंच या व्यतिरीक्त कोणताही स्वतंत्र साक्षीदार

सदर कारवाईमध्ये नव्हता, ही बाब मान्य केली. तसेच, घटनास्थळी अवैध व्यवसाय चालतो याबाबत आजूबाजूला चौकशी केली नाही. तसेच, सदर हॉटेलमध्ये अवैध व्यवसाय चालतो त्या हॉटेलचा परवाणा रद्द करण्याबाबत महसुल विभाग व प्रांत अधिकारी यांना कळविले नाही. तसेच, आरोपींकडून पोलीस कोठडीदरम्यान कोणताही मुद्देमाल मिळून आला नसल्याची बाब कबुल केली.

**१२.** अभियोग पक्षाचे सा.क्र.४ भगवान निंबाळकर यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते सन २०१६ ते १८ या कालावधीमध्ये दौंड पोलीस स्टेशन येथे प्रभारी म्हणून कार्यरत असल्याचे नमुद केले. सदर साक्षीदाराने उपरोक्त सा.क्र.३ यांचे जबाबाप्रमाणे सर्व घटनाक्रम सांगितला. त्यांचे साक्षीत पुढे असे आले आहे की, त्यांनी मुद्देमाल जप्त करताना केलेला पंचनामा नि.क्र.१०५ वर त्यांची सही आहे. तसेच, त्यांनी जप्त मुद्देमाल पावती नि.क्र.१०८ तयार केली. सदर साक्षीदाराचे साक्षीत उपरोक्त नि.क्र.१०५ वरील जप्ती पंचनामा व नि.क्र.१०८ वरील मुद्देमाल पावती शाबीत करण्यात आली. सदर साक्षीदाराचे साक्षीत जप्त करण्यात आलेले निरोधचे बॉक्स आर्टीकल अ, लोखंडी मुठ असलेला कोयता आर्टीकल ब, तसेच दुसरा लोखंडी मुठ असलेला कोयता आर्टीकल सी तसेच, दोन लोखंडी ऊस तोडण्याचे कोयते आर्टीकल डी व इ तसेच, ५००/–रुपयांची नोट क्र.९एएच१५१३१५ आर्टीकल एफ, दोन सॅमसंग कंपनीचे मोबाईल आर्टीकल जी व एच, पिडीत महिला शालीनी नरवडे यांचा मोबाईल आर्टीकल आय, पीडीत महिला लक्ष्मी ठाकूर यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल आर्टीकल जे, पिडीत महिला पींकी शेख यांचा जप्त केलेला सॅमसंग कंपनीचा मोबाईल व ५००/– रूपयांच्या ४ नोटा आर्टीकल के, पीडीत महिला लाखी मुल्ला यांचा पॅनासॉनिक कंपनीचा मोबाईल व २००० रूपयांची नोट आर्टीकल एल, पिडीत महिला पंचशिला नरवडे यांचा सॅमसंग कंपनीचा मोबाईल आर्टीकल एम हे शाबीत करण्यात आले. सदर साक्षीदाराचे उलटतपासात त्याने कबूल केले की, सदर घटनास्थळी अवैध वेश्या व्यवसाय चालू असल्याची कोणतीही तक्रार मिळाली नाही. तसेच, त्यांनी घटनास्थळीच्या आजूबाजूला

घटनास्थळावर अवैध व्यवसाय चालत असण्याबाबत सांगणारा साक्षीदार मिळून आला नसल्याचे कबुल केले. तसेच, जप्त मुद्देमाल बाजारात सहज मिळत असल्याची बाब कबुल केली. सदर साक्षीदाराने कबुल केले की, जप्त मुद्देमालाच्या पाकीटांना स्टेपलरने पीन लावल्याने व सील लावलेले नसल्यामुळे त्या पाकीटाची पीन काढून मुद्देमाल जमा किंवा काढून घेतला जावू शकतो. याव्यतिरीक्त विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारात्मक उत्तरे दिली.

**१३.** अभियोग पक्षाचा सा.क्र.५ असिफ शेख यांचे साक्षीत असे आले आहे की, ते दि.२९.०७.२०१७ रोजी दौंड पोलीस स्टेशन येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत असताना त्यांना कृष्णा इंटरनॅशनल येथे वेश्या व्यवसाय चालू असल्याने कारवाई करण्याकरीता सदर छापा टाकणा–या पथकात घेण्यात आले. सदर साक्षीदाराने देखील हॉटेलमध्ये जाईपर्यंतचा सर्व घटनाक्रम नमुद केला. सदर साक्षीदाराचे उलटतपासात त्याने पोलीस मुख्यालय, पुणे येथून आलेले कर्मचारी देखील त्यांचेसोबत असल्याची बाब त्यांनी नमुद केली. सदर साक्षीदाराने कबुल केले की, घटनास्थळाच्या आजूबाजूच्या कोणत्याही व्यक्तीने सदर हॉटेलमध्ये अवैध वेश्या व्यवसाय चालतो असे सांगितले नाही. सदर साक्षीदाराने त्याला बनावट ग्राहकाचा तसेच, दोन पंचांचा नाव व पत्ता सांगता येत नसल्याची बाब कबूल केली. याव्यतिरीक्त विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्याने नकारात्मक उत्तरे दिली.

**१४.** अभियोग पक्षाचा सा.क्र.६ सुनिल बगाडे यांच्या साक्षीत असे आले आहे की, सन २०१७ साली ते पोलीस स्टेशन दौंड येथे पोलीस हवालदार या पदावर कार्यरत असताना पोलीस स्टेशनमध्ये स्थानीक गुन्हे शाखा पुणे येथील अधिकारी शेख व इतर कर्मचारी आले होते. सदर कर्मचा–यांनी पी.आय. निंबाळकर यांना दौंड येथील कृष्णा इंटरनॅशनल लॉजमधील वेश्या व्यवसायाबाबत बातमी दिली. त्यानुसार निंबाळकर सा.क्र.५ यांनी डमी ग्राहक व दोन पंच यांना बोलावून सायंकाळी ७ वाजता घटनास्थळी गेले. त्यानंतर सदर डमी ग्राहकास

हॉटेलमध्ये पाठवून सर्व कर्मचारी हॉटेलच्या आजूबाजूला डमी ग्राहकाच्या इशा–याची वाट पाहत राहिले. सदर साक्षीदाराने घटनास्थळी जप्त केलेल्या मुद्देमालाचे विवरण नमुद केले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्याने कबुल केले की, घटनास्थळाच्या आजूबाजूला ५ ते ६ हॉस्पीटल आहेत. तसेच, सदर हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय चालतो याबाबत त्यांच्याकडे कोणतीही लेखी तक्रार आली नव्हती. त्यांना घटनास्थळावरील आरोपींची तसेच ५ मुलींची व मुद्देमाल जप्त केलेल्या पंचांची नावे सांगता येत नसल्याचे कबुल केले. त्यानंतर विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारात्मक उत्तरे दिली.

**१५.** अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदाच्या व उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केले असता, सदर प्रकरणामध्ये एकुण ६ साक्षीदारांना अभियोग पक्षाने तपासले आहे. सदर प्रकरणातील उपरोक्त कलमांचे अवलोकन केले असता प्रथम, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ चे अवलोकन केले असता, सदर कायद्यातील कलमांच्या अनुषंगाने आरोपी हे सदर घटनास्थळी असलेला वेश्या व्यवसाय हा सुरू होता व करत होते. तसेच, सदर वेश्या व्यवसायाच्या कमाईवर ते त्यांचे उपजीवीका करत होते किंवा कसे? ही बाब अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच, कलम ५ च्या अनुषंगाने सदर वेश्या व्यवसायामध्ये पिडीत महिलांना सदर आरोपींनी जाणीवपुर्वक आणले आहे व त्यांच्याकडून सदर व्यवसाय करवून घेतला आहे, याबाबत पुरावा येणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाचे अभियोग पक्षाचे सा.क्र.३ ते ६ यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरणात केवळ पोलीस साक्षीदार तपासलेले आहेत. घटनास्थळ हे वेश्या व्यवसायासाठी वापरले जात होते याबाबतचा कोणताही त्रयस्थ असा साक्षीदार अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे घटनास्थळी वेश्या व्यवसाय चालत होता याविषयी अभियोग पक्षाचे पोलीस साक्षीदारांव्यतिरिक्त इतर कोणताही साक्षीदार अभिलेखावर आला नाही. तसेच, तपासी अधिका–याने जरी प्रकरणामध्ये घटनास्थळाच्या हॉटेल/लॉजचा करारनामा जप्त केला असला तरी प्रकरणामध्ये हॉटेल मालकाची साक्ष अभियोग पक्ष नोंदवू शकला नाही. त्यामूळे सदर

करारनामा शाबीत होवू शकला नाही व सदर हॉटेल हे आरोपींनी कोणत्या कारणासाठी घेतले ही बाब देखील सिध्द होवू शकलेली नाही.

१६. तसेच, सदर कलम ४ व ५ च्या अनुषंगाने अभियोग पक्षाने प्रकरणात ज्या महिलांकडून मुद्देमाल जप्त केला आहे त्या महिलांची साक्ष घेणे गरजेचे होते. सदर महिलांच्या साक्षीतुन त्यांना वेश्या व्यवसायामध्ये बळजबरीने व जाणीवपुर्वक आरोपींनी आणले आहे ही बाब अभिलेखावर आली असती परंतू, अभियोग पक्ष पीडीत महिलेपैकी एकाही महिलेची साक्ष नोंदवू शकला नाही व सदर बाब अभियोग पक्षास मारक ठरते. तसेच महत्तवाची बाब म्हणजे अभियोग पक्षाने जो डमी ग्राहक घटनेवेळी पाठविला होता. सदर ग्राहकाची साक्ष ही अत्यंत महत्त्वाची आहे. परंतू, अभियोग पक्षाने सदर प्रकरणात त्याची साक्ष नोंदविली नाही. त्यामुळे प्रकरणातील आरोपींविरूध्द शाबीत होणारे अनैतिक व्यापार प्रतिबंधक कलम ४ व ५ यातील मुळ घटक हे शाबीत होवू शकले नाहीत व सदर बाब अभियोग पक्षास मारक ठरली.

१७. तसेच, सदर प्रकरणात अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याची कलम २(i) मध्ये विषेश पोलीस अधिकारी या संज्ञेचे अवलोकन केले. त्यावर अनैतिक प्रतिबंधक व्यापार कायद्यामध्ये तपास करण्याकरीता संबंधीत पोलीस स्टेशन येथे शासनाने नेमुन दिलेल्या विशिष्ठ अशा अधिका–याची नेमनुक व त्या अधिका–याने तपास करणे तसेच, त्याबाबत कारवाई करणे गरजेचे आहे. परंतू, त्याअनुषंगाने देखील अभियोग पक्षाने कोणताही दस्तऐवज प्रकरणात दाखल केल्याचे दिसून येत नाही. एकंदरीत सदर आरोपींनी घटनास्थळ हॉटेल कृष्णा इंटरनॅशनल येथे वेश्या व्यवसाय चालवला ही बाब सिध्द होवू शकली नाही. तसेच, या प्रकरणामध्ये मुद्देमाल पैसे हे आरोपींकडून जप्त करण्यात आले असले तरी प्रकरणातील पिडीत महिलांची साक्ष झाली नसल्याने सदर आरोपींकडील पैसे हे सदर पिडीत महिलेंच्या कमाईतून आरोपींना मिळाल्याची बाब अभियोग पक्ष सिध्द करू शकला नाही. तसेच, पिडीत महिलांची साक्ष नोंदविली नसल्याने सदर महिलांना आरोपींनी घटनास्थळी मुद्दामहून व त्यांना कोणतेतरी

अमिश अथवा जबरदस्ती करून वेश्या व्यवसायात आणले ही बाब सदर पीडीत महिलांची साक्ष झाली नसल्याने अभियोग पक्ष सिध्द करू शकला नाही.

१८. सदर प्रकरणात आरोपींकडून लोखंडी कोयते जप्त करण्यात आल्याचे अभिलेखावर आले आहे. सदर लोखंडी कोयते तसेच, प्रकरणात जप्त करण्यात आलेले निरोधचे बॉक्स तसेच, पिडीत महिलांकडील मोबाईल व आरोपींकडील मोबाईल तसेच, आरोपी व पिडीत महिलांकडील रोख रक्कम याबाबत सा.क्र.४ यांनी त्यांचे जबाबात नमुद केले तसेच, सा.क्र.३ व ४ हे जप्त करताना जप्ती पंचनाम्यावेळी हजर असल्याचे त्यांचे साक्षीवरून स्पष्ट होते परंतू, जप्ती पंचनाम्यावरील तसेच, घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार अभियोग पक्षास फितूर झाले आहेत. जप्ती पंचनाम्यातील मजकूर हा अभियोग पक्षाचे सा.क्र.३ ते ६ यांनी त्यांचे जबाबात नमुद कला आहे. सदर पोलीस अधिकारी हे खोटा पंचनामा का करतील याबाबत आरोपींच्या वकीलांनी कोणताही बचाव घेतलेला नाही. त्यामुळे जरी घटनास्थळ जप्ती पंचनामा नि.क्र.१०५ शाबीत झाला असला तरी भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ च्या अनुषंगाने या ठिकाणी सदर प्रकरणातील आरोपी हे घटनास्थळ हॉटेल चालवित असल्याबाबतचा कोणताही लेखी पुरावा अभिलेखावर दाखल नाही. तसेच, घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच अभियोग पक्षास फितूर झाल्याने आरोपींच्या ताब्यातुन लोखंडी कोयते जप्त केले याबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे भारतीय शस्त्र कायदा कलम ४, २५ च्या अनुषंगाने आवश्यक असणारे घटक अभियोग पक्ष संशयापलीकडे सिध्द करू शकला नाही. करीता, उपरोक्त चर्चेवरून आरोपींविरूध्द उपरोक्त कलमांन्वये गुन्हा सिध्द होत नसल्याने व मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

<u>मुद्दा क्र. ४ करीता :</u>

१९. मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. प्रकरणात जप्त करण्यात आलेले सात मोबाईल व रोख रक्कम ही

व्हीपीआर क्र.६/२०२३ (पी.आर.क्र.५७/२०२३) अन्वये न्यायालयात जमा केल्याचे दिसून येते. प्रकरणातील पिडीत महिला अथवा आरोपीने सदर रोख रक्कम व मोबाईलची मागणी अद्यापपर्यंत केलेली नाही. तसेच, इतर कोणीही सदर मुद्देमालाची मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर मोबाईल व रोख रक्कम ही मौल्यवान असल्याने अपील कालावधीनंतर सरकार जमा करणे न्यायोचित आहे. मोबाईलचा लिलाव करून येणारी रक्कम सरकारजमा करण्यात यावी. जप्त करण्यात आलेले ४ लोखंडी कोयते व एक खाकी रंगाचा पुठ्ठयाचा बॉक्स त्यात जरुर कंपनीचे निरोध पाकीटे (पी.आर.क्र.५२/२०२३) हे मुल्यहिन असल्याने ते अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत. करीता, मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

## :: **आदेश** ::

**१.** आरोपी क्र. १. दिवाकर मधु शेट्टी, आरोपी क्र.२. भास्कर बंडु शेट्टी, आरोपी क्र.३. चंद्रशेखर सुंदर शेट्टी यांना कलम २४८(१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ नुसार अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ४,५ सह शस्त्र अधिनियम १९५९ कलम ४, २५ अन्वये दोषारोपातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

**२.** प्रकरणात जप्त मुद्देमाल सात मोबाईल व रोख रक्कम (व्हीपीआर क्र.६/२०२३)/(पी.आर.क्र.५७/२०२३) अन्वये न्यायालयात जमा केले आहे. रोख रक्कम ही मौल्यवान असल्याने अपील कालावधीनंतर सरकार जमा करावी. जप्त मोबाईलचा लिलाव करून येणारी रक्कम अपील कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावी. जप्त करण्यात आलेले ४ लोखंडी कोयते व एक खाकी रंगाचा पुठ्ठयाचा बॉक्स त्यात जरुर कंपनीचे निरोध पाकीटे (पी.आर.क्र.५२/२०२३) हे मुल्यहिन असल्याने ते अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत.

**३.** आरोपींचे पूर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रीया संहितचे कलम ४३७–अ नुसार रू. १५,०००/– (रक्कम रुपये पंधरा हजार फक्त) चे प्रत्येकी वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2026.07.06 17:59:05 +0530

दौंड.

दिनांक:०६.०७.२०२६

**(एस.एन. पाटील)**

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र.२, दौंड, जि. पुणे

## **प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | - | श्री. वैभव धनंजय पद्मन |
| न्यायालयाचे नाव | - | श्री. एस. एन. पाटील<br>२रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तथा<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी दौंड. |
| न्यायनिर्णय निकाल दिनांक | - | **०६.०७.२०२६** |
| न्यायनिर्णयावर स्वाक्षरी दिनांक | - | **०६.०७.२०२६** |
| न्यायनिर्णय पी.डी.एफ. दिनांक | - | **०६.०७.२०२६** |